# जागतिक एड्स नियंत्रण दिन सप्ताह २००८

## -: अनुक्रमणिका :-


| अ.क्र. | उपक्रम | पान क्र. |
|---|---|---|
| १. | पार्श्वभूमी | |
| २. | मार्गदर्शक सूचना | |
| ३. | संयोजन समितीचे गठण | |
| ४. | पत्रकार परिषद | |
| ५. | कार्यक्रमाचे प्रत्यक्ष नियोजन | |
| ६. | रॅली | |
| ७. | युवक मेळावा | |
| ८. | ट्रकर्स मेळावा | |
| ९. | महिला मेळावा | |
| १०. | डॉक्यूमेंटेशन व छायाचित्रण | |
| ११. | प्रत्येक जिल्हानिहाय कार्यक्रमासाठी आर्थिक तरतूद | |
| १२. | सिंहावलोकन | |
| १३. | पत्रकार परिषदेचा मसूदा | |
| १४. | महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण कार्यक्रमाची संक्षिप्त टिप्पणी | |
| १५. | एचआयव्ही/एड्स आकडेवारी | |
| १६. | पीपीटीसीटी अशासकीय संस्थेची यादी | |
| १७. | एआरटी सेंटरची यादी | |
| १८. | पत्रकार परिषदेचा प्रत्याभरण अहवाल | |
| १९. | प्रसार माध्यमातून मिळालेल्या प्रसिद्धीचा अहवाल | |
| २०. | उपयोगिता प्रमाणपत्र व विनीयोग प्रमाणपत्र | |
| २१. | युवक मेळावा व ट्रकर्स मेळाव्याच्या शेवटी घ्यावच्या शपथेचा मसुदा | |

# जागतिक एड्स नियंत्रण दिन सप्ताह २००८

## पार्श्वभूमी

सन २००८ च्या जागतिक एड्स दिनाची मध्यवर्ती संकल्पना **'नेतृत्व'** आहे. ही संकल्पना व सन २००५ पासून स्विकारण्यात आलेले जागतिक एड्स दिनाचे घोषवाक्य **'वचन पाळा-एड्स टाळा'** या भोवती सन २००८ चे जागतिक एड्स दिनाचे कार्यक्रम केंद्रित असणार आहेत.

**'नेतृत्व'** या संकल्पनेद्वारे सर्व स्तरावरील नेतृत्वाला एड्सला रोखण्याचे आवाहन करण्यात येत आहे. सन २००६ च्या जागतिक एड्स दिनाची मध्यवर्ती संकल्पना **'जबाबदारी'** (accountability) होती. नेतृत्व ही यावर्षीची मध्यवर्ती संकल्पना एड्स विरुद्धच्या लढयाबाबत यापूर्वी व्यक्त करण्यात आलेले निर्धार व त्यांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणी दरम्यान राहिलेल्या त्रुटी यावर भर देते. **'नेतृत्व'** या संकल्पनेव्दारे व्यक्ती, संस्था, शासन या सर्वांनाच एड्स विरोधी लढयात पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सन २००७ च्या जागतिक एड्स दिनाच्या निमित्ताने जगातील सर्व नागरिकांना एड्स विरोधी अभियानात पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले होते. विविध प्रकारच्या उपक्रमांव्दारे वर्षभर लोकांचा पुढाकाराने एड्स विरुद्धच्या लढयात अनेक संकल्प सोडण्यात आले, वचनं घेण्यात/देण्यात आली. आता हे संकल्प सिद्धीस नेण्याची व वचने पाळण्याची वेळ आली आहे.

## सन २००८ चे महत्व :

सन २००८ हे जागतिक एड्स दिनाचे विसावे वर्ष आहे. सन १९९८ पासून एड्स व त्या विरुद्धच्या लढयाचे स्वरुप यात लक्षणीय बदल झालेत. त्यापैकी बरेचसे बदल सकारात्मक असले तरी करण्याचे सारखे अजून बसेच काही शिल्लक असल्याचे स्मरण या विसाव्या वर्धापनदिनी ठेवणे आवश्यक आहे. याबाबतीत खालील मुद्दे महत्वाचे ठरतात:

- जगातील बहुतेक देशांतील नेत्यांनी एड्सचा धोका मान्य केला असून त्याबाबतीत ठोस कार्यक्रम हाती घेण्याचा संकल्प सोडला आहे. बहुतेक सर्व देशांनी एड्सविषयक राष्ट्रीय धोरणाची आखणीही केलेली आहे. मात्र अनेक देशांमध्ये या धोरणांची पूर्णपणे अंमलबजावणी झालेली दिसत नाही व ब-याच ठिकाणी या कार्यक्रमांसाठी पूरेसा निधी दिला जात नाही.

- सन १९९८ च्या तुलनेत एचआयव्ही व एड्सवरील उपचारांच्या सुविधा अधिक व्यापक व सहजरित्या उपलब्ध झाल्या असल्या तरी ब-याच लोकांना या सुविधांचा लाभ घेता येत नाही. सन २००७ मध्ये गरीब व मध्यम उत्पन्न असणा-या देशांतील गरजु रुग्णांपैकी फक्त ३१ टक्के रुग्णांनाच या सुविधांचा लाभ मिळाला.
- एचआयव्ही बाबत जनजागृतीचे कार्यक्रम जगातील कानाकोप-यात होत असूनही एचआयव्ही संसर्गाचा दर हा उपचार घेणा-या व्यक्तींच्या संख्येत होणा-या वाढीपेक्षा २.७ पट जास्त आहे.
- एचआयव्ही सह जगणा-या व्यक्तींना संरक्षण देणा-या देशांच्या संख्येत वाढ होत असतांना आजही एक तृतीयांश देशांमध्ये या व्यक्तींना कायद्याचे संरक्षण मिळालेले नाही. कलंक व भेदभाव हे एचआयव्ही/एड्स विरुद्धच्या लढयातले मोठे अडथळे आजही अनेकांची आयुष्य उध्वस्त करीत आहेत.

जागतिक एड्स दिनाची सुरुवात १९८८ मध्ये जगातील विविध देशातील आरोग्य मंत्र्यांच्या परिषदेत झाली. यावेळी प्रतिवर्षी १ डिसेंबर हा दिन एचआयव्ही/एड्स विरोधी लढयातील आपले योगदान व आपला पाठिंबा व्यक्त करण्यासाठी पाळण्याचा निर्णय घेण्यात आला.

सन २०१० पर्यंत सर्वांसाठी समग्र प्रतिबंध कार्यक्रम, उपचार, निगा व देशभाल उपलब्ध करुन देण्याचे ध्येय आपल्याला गाठायचे आहे. त्यासाठी नेतृत्व व कृती करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. शासकीय स्तरावरुन देण्यात आलेल्या आश्वासनांची पूर्तता केली गेली पाहिजे. समाजातील घटकांनी त्यांच्यातील नेतृत्वाला प्रोत्साहन दिले पाहिजे. सर्वसामान्य व्यक्तींना उपचाराच्या सुविधांचा लाभ घेण्यासाठी सक्षम बनविण्याची गरज आहे. एचआयव्ही/एड्स पासून स्वत:चा बचाव कसा करता येईल व तो पसरण्यास प्रतिबंध कसा करता येईल, याची माहिती मिळविण्याचा सर्वांना हक्क आहे. एचआयव्ही/एड्स मुळे कुणाच्याही मानवाधिकारांचे उल्लंघन होणार नाही व त्यामुळे त्यांना कलंक वा भेदभावाची वागणुगक मिळणार नाही यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीला जागरुक होऊन या लढयात नेतृत्व करण्याची गरज आहे. म्हणूनच आज नेतृत्व करुन समाजाला सक्षम बनविण्याची व एचआयव्ही/एड्सला रोखण्याचे ध्येय गाठण्याची वेळ आली आहे.

# एड्स कार्यक्रमाची कार्यप्रणाली

## एड्स कार्यक्रमाचे उद्दिष्ट

एड्स कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट हे एड्स साथीच्या विरोधात सर्वांना प्रोत्साहित करून दीर्घकाळापर्यंत लढा देत राहण्यासाठी प्रेरणा देणे हे आहे.

सर्व सहभागी गटांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकार्य करून मदतीच्या कक्षा रूंदावण्याचे या कार्यक्रमाचे ध्येय आहे. जनजागृती करून पूर्वीच्या ध्येय धोरणांची माहिती व वचनांची आठवण करून देऊन उद्दिष्टपूर्तीसाठी एड्स विरूद्ध लढण्याचे यात आव्हान केले आहे. या वचनांसाठी राष्ट्रीय सरकारांना देखील आठवण करून देऊन जबाबदारीची जाणीव करून देण्यात येत आहे.

## कार्यप्रणालीची उद्दिष्टे :

- एचआयव्ही/एड्स विरूद्धच्या लढ्यात राष्ट्रीय सरकार व नेत्यांनी ठरविलेल्या धोरण, उद्दिष्टपूर्तीसाठी ते कार्यरत राहतील याची खात्री करून देणे.
- एड्स विरूद्ध कार्यक्रमांच्या परस्पर सहकार्याने स्थानिक प्रयत्नांची जागतिक प्रभावासाठी सांगड घालणे.
- एचआयव्ही/एड्स लढ्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व सहाय्यक घटक उपलब्ध करून देणे.
- एचआयव्ही/एड्स विरूद्ध लढ्यासाठी समाजाचा प्रत्यक्ष सहभाग वाढूवन त्याच्या कक्षा रूंदावणे व अधिक प्रबळ करणे.

## कार्यक्रमाचे सरकारी घटक :

UNAIDS (युएनएड्स) हा जागतिक एड्स कार्यक्रमाचा प्रमुख तांत्रिक सल्लागार आहे. तथापि या कार्यक्रमात अनेक महत्वाचे घटक उद्दीष्टपूर्तीसाठी कार्यरत आहेत.

- राष्ट्रीय / सामाजिक कार्यक्रम.
- संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सहकारी संस्था व सरकारे.
- एड्सचे प्रचारक व कार्यकर्ते.
- राष्ट्रीय एड्स नियंत्रण / प्रतिबंध कार्यक्रम, एड्स संघटना व सामाजिक संघटना, अशासकीय ऐच्छिक कार्य संघटना.
- जागतिक सहकारी गट उदा. ग्लोबल युनियन्स एड्स कार्यक्रम व ग्लोबल मुव्हमेंट फॉर चिल्ड्रेन.
- सर्वसाधारण जनता.
- एचआयव्ही/एड्स बाधित व्यक्ती व त्यांच्या संघटना.
- महत्वाच्या / प्रतिष्ठित व्यक्ती.

- मालक व मजूर.
- धार्मिक संघटना.
- आरोग्य कर्मचारी.
- शिक्षक व विद्यार्थी.
- पत्रकार.
- जीएफएटीएम - दी ग्लोबल फंड टू फाईट एड्स, टी.बी. व मलेरिया.

*******

# जागतिक एड्स नियंत्रण दिन २००८

## मार्गदर्शक सूचना

१. जागतिक एड्स नियंत्रण दिन -
१ डिसेंबर.(सोमवार)

२. संयोजन समितीची स्थापना -
प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा एड्स नियंत्रण समिती यांच्या अध्यक्षतेखाली संयोजन समितीची स्थापना केली जाईल व जिल्हा शल्य चिकित्सक या समितीचे पदसिद्ध सचिव असतील.

संयोजन समितीचे खालील प्रमाणे १० सदस्य असतील -

- मुख्य कार्यकारी अधिकारी (जि. प.) - सदस्य
- जिल्हा पोलीस प्रमुख - सदस्य
- महानगरपालिका आयुक्त / नगरपालिका मुख्यधिकारी - सदस्य
- जिल्हा आरोग्य अधिकारी - सदस्य
- जिल्हा माहिती अधिकारी - सदस्य
- जिल्हा शिक्षण अधिकारी - सदस्य
- जिल्हा महिला कल्याण व बालविकास अधिकारी - सदस्य
- महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेमार्फत चालविल्या जाणाऱ्या हस्तक्षेप प्रकल्पात सहभागी असलेल्या जिल्ह्यातील अशासकीय संस्थेचा प्रमुख - सदस्य
- अध्यक्ष, रोटरॅक्ट क्लब (आंतरराष्ट्रीय अशासकीय संस्था) - सदस्य
  जिल्हा मुख्यलयाच्या ठिकाणी असलेल्या महिला - सदस्य महाविद्यालयातील क्रियाशील प्राध्यापिका
- महिला आर्थिक विकास महामंडळाचे प्रतिनिधी - सदस्य

संयोजन समितीत महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेच्यावतीने चालविल्या जाणाऱ्या लक्ष्यगट हस्तक्षेप प्रकल्पात सहभागी असलेल्या अशासकीय संस्थांची यादी मार्गदर्शक सुचना पुस्तिकेत देण्यात आली आहे. काही जिल्ह्यात एकापेक्षा जास्त अशासकीय संस्था आहेत अशा जिल्ह्यातून प्रत्येक अशासकीय संस्थेच्या प्रमुखाचा संयोजन समितीत समावेश करण्यात यावा.

संयोजन समितीची बैठक आयोजित करुन जागतिक एड्स दिन २००८ च्या कार्यक्रमाची आखणी व नियोजन करावे. संयोजन समितीच्या स्थापनेबाबत सर्व सदस्यांना स्वतंत्र पत्र जिल्हा शल्य चिकित्सक तथा सदस्य सचिव यांनी पाठवून पूर्व कल्पना द्यावी. संयोजन समितीच्या बैठकीसाठी लागणारा खर्च जिल्हा शल्य चिकित्सकांकडे अधिनस्त असलेल्या अनुदानातून करण्यात यावा.

आर्थिक तरतूद - प्रत्येक जिल्हा शल्य चिकित्सक रू. २०००/- (रूपये दोन हजार मात्र)

## ३. पत्रकार परिषद –

जागतिक एड्स दिनानिमित्त व राबविल्या जाणाऱ्या उपक्रमाबाबतची माहिती स्थानिक प्रसारमाध्यमातून व्हावी या दृष्टीने १ डिसेंबर पूर्वी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात यावे. या पत्रकार परिषदेत संयोजन समितीच्या सदस्यांनाही उपस्थित राहण्याबाबत निर्देश देण्यात यावेत. पत्रकार परिषदेसाठी स्थानिक वृत्तपत्रांचे संपादक, प्रतिनिधी, पत्रकार संघाचे अध्यक्ष, सदस्य, दुरचित्रवाणी, नमोवाणी (आकाशवाणी) यांचे वार्ताहर व प्रसारमाध्यमातील प्रमुख यांना निमंत्रित करण्यात यावे. पत्रकार परिषदेत जागतिक एड्स दिन सप्ताह मोहीम, जागतिक एड्स दिनाचे घोषवाक्य नेतृत्व, जागतिक एड्स दिन सप्ताहाच्या निमित्ताने राबवले जाणारे उपक्रम, एचआयव्ही/एड्स बाबत जिल्ह्यातील सद्यस्थिती, एचआयव्ही/एड्स बाबतची आकडेवारी महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेच्या कार्याबाबत व कार्यक्रमाबाबत माहिती देण्यात यावी. पत्रकार परिषदेत पत्रकारासाठी चहापान व अल्पोपहार देण्यात यावा.

पत्रकार परिषदेत वितरित करावयाच्या प्रसिद्धी पत्रकाचा मसुदा, माहितीचा मसुदा, पत्रकार परिषदेच्या प्रत्याभरण अहवालाचा मसुदा, प्रसारमाध्यमातून मिळालेल्या प्रसिद्धीच्या अहवालाचा मसुदा सोबत देण्यात आला आहे. पत्रकार परिषदेच्या प्रसिद्धी पत्रकाचा मसुदा आहे त्या स्वरूपात जसाच्या तसा घेण्यात यावा अन्यथा पत्रकार परिषदेसाठी झालेला खर्च ग्राह्य धरला जाणार नाही. पत्रकार परिषदेसाठी लागणारा खर्च जिल्हा शल्य चिकित्सक यांचे अधिनस्त असलेल्या अनुदानातून करण्यात यावा.

आर्थिक तरतूद - प्रत्येक जिल्हा शल्य चिकित्सक रू. २०००/- (रूपये दोन हजार मात्र)

## ४. कार्यक्रमाचे प्रत्यक्ष नियोजन -

कार्यक्रमाचे प्रत्यक्ष नियोजन करताना संयोजन समितीच्या प्रत्येक सदस्याला याबाबत माहिती देण्यात यावी. तसेच जागतिक एड्स दिन प्रत्यक्ष नियोजनात संबंधित सदस्याच्या कार्यक्षेत्रातील कार्यालय व संस्था यांचे सहकार्य घेण्यात यावे. त्यामूळे जागतिक एड्स दिन मोहिमेला व्यापक स्वरूप प्राप्त होईल व जागतिक एड्स दिनाच्या निमित्ताने आयोजित केल्या जाणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमाची व आर्थिक तरतुदीची माहिती संयोजन समितीच्या प्रत्येक सदस्याला स्वतंत्रपणे देण्यात यावी.

## ५. रॅलीचे आयोजन (दि. १ डिसेंबर २००८) –

**जिल्हा** महाविद्यालय व मुख्यालयाच्या ठिकाणी **दि. १ डिसेंबर २००८ रोजी जागतिक एड्स दिन असल्याने या दिवशी** रॅलीचे **आयोजन करण्यात यावे.**

- या रॅलीत **इयत्ता ११ वी व १२ वी वरिष्ठ व वैद्यकीय महाविद्यालयाचे विद्यार्थी व विद्यार्थीनींना, सहभागी करून घ्यावे. तसेच एनसीसी विद्यार्थी-विद्यार्थीनींना जास्तीत-जास्त संख्येने सहभागी करणे आवश्यक आहे. एन.एस.एस. च्या संबंधित प्राध्यापकांचे सहकार्य घेण्यात यावे.**
- या रॅलीत प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा सहभाग असता कामा नये.
- सदर रॅलीच्या आयोजनात अशासकीय संस्थांचा सहभाग असावा.
- या रॅलीत **स्थानिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील नेते, संस्था आणि मान्यवर व्यक्ती उपस्थित राहतील यासाठी प्रयत्न करावेत.**
- या रॅलीची **सुरूवात करण्यापूर्वी शपथ वाचन करावे. शपथेचा मसुदा देण्यात आला आहे.**
- या रॅलीत **सहभागी विद्यार्थी व मान्यवरांसाठी चहापान, बिस्किटे व पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्यात यावे.**
- **जागतिक एड्स दिन सप्ताहाचे घोषवाक्य ''नेतृत्व करा'' ''वचन पाळा-एड्स टाळा'' या घोषवाक्याचे फलक** रॅलीसाठी **तयार करण्यात यावेत.**
- रॅलीच्या **शेवटी शपथ घेण्यात यावे. (शपथेचा मसुदा सोबत जोडला आहे).**
- **रॅलीचा खर्च जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या अधिनस्त देण्यात आलेल्या अनुदानातून करण्यात यावा. संयोजन समितीत सहभागी सदस्यांच्या कार्यालयांच्या सहभागाने व समन्वयाने प्रभात फेरी कार्यक्रमाचे आयोजन करावे.**
- **<u>आर्थिक तरतूद</u> - प्रत्येक जिल्हा शल्य चिकित्सक रू. १५,०००/- (रूपये पंधरा हजार मात्र)**

## ६ युवकांसाठी मेळावा -

- जिल्हयांत एक युवक मेळावा आयोजित करण्यात यावा.
- या मेळाव्याला महाविद्यालयीन युवक-युवतीचा सहभाग असावा.
- मेळाव्याची **सुरूवात करण्यापूर्वी शपथ वाचन करावे. शपथेचा मसुदा देण्यात आला आहे.**
- या मेळाव्यात आरोग्य व एचआयव्ही/एड्स या विषयांवर वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ मंडळींचे व्याख्यानमाला आयोजित करावी.
- सदर मेळाव्यात एका पॉझीटिव्ह स्पिकरला आमंत्रित करुन त्यांचे अनुभव उपस्थित युवकांसमोर ठेवण्यास सांगावे. यासाठी जिल्हयातील एचआयव्हीसह जगणा-या व्यक्तींच्या संघटनेशी संपर्क साधून वक्ता ठरवावा.
- मेळाव्याच्या परिसरात युवकांना एचआयव्ही/एड्स बाबत योग्य माहिती देणा-या कार्यक्रमांचे आयोजन करावे. यात युवकांना जबाबदारीचे वर्तन, आरोग्यविषयक समस्या,

एचआयव्ही/एड्स संबंधीच्या गैरसमजुती या विषयांवर कार्यक्रम सादर करावे. शेवटी प्रश्न-उत्तरांच्या स्वरुपात त्यांच्या शंकाचे निरसन तज्ञांमार्फत करावे

- जागतिक एड्स दिन सप्ताहाचे घोषवाक्य **''नेतृत्व करा''** **''वचन पाळा-एड्स टाळा''** या घोषवाक्याचे फलक तयार करण्यात यावे.
- कलंक व भेदभाव, सुरक्षित रक्त, जबाबदारीचे वर्तन, या विषयांवर बॅनर्स तयार करण्यात यावे व ते शहरातील प्रमुख ठिकाणी लावावेत.
- युवकांना आयसीटीसी व एआरटी केंद्राबाबत सविस्तर माहिती देणे तसेच या केंद्रांवर प्रत्यक्ष भेट देऊन तेथे पूरविल्या जाणा-या सुविधा व कार्यप्रणाली विषयी युवकांना मार्गदर्शन करावे.
- मेळाव्याच्या शेवटी शपथ घेण्यात यावी.
- **मेळाव्याचा खर्च जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या अधिनस्त देण्यात आलेल्या अनुदानातून करण्यात यावा. संयोजन समितीत सहभागी सदस्यांच्या कार्यालयांच्या सहभागाने व समन्वयाने प्रभात फेरी कार्यक्रमाचे आयोजन करावे.**
- **<u>आर्थिक तरतूद</u> - प्रत्येक जिल्हा शल्य चिकित्सक रू. ४०,०००/- (रूपये चाळीस हजार मात्र)**

**खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र | कार्यक्रम | प्रत्येकी तरतूद |
|---|---|---|
| १. | तज्ञ मंडळींची व्याख्यानमाला | २,००० |
| २. | पॉझीटिव्ह स्पिकरचे मानधन | १,००० |
| ३. | बॅनर्स | १०,००० |
| ४. | अल्पोपहार | १५,००० |
| ५. | जनजागृतीपर कार्यक्रम | ५,००० |
| ७. | इतर खर्च | ७,००० |
| | एकुण खर्च | ४०,००० |

## ७ ट्रकर्स मेळावा -

- ट्रक / वाहन चालकांमध्ये **जनजागृती करण्यासाठी संबंधित** जिल्हयातील ट्रक मालक चालक संघटनेच्या मदतीने **मेळाव्याचे आयोजन करावे. या मेळाव्या**त आरटीओच्या अधिका-यांचा **सहभाग आवश्यक आहे.**
  हा मेळावा जागतिक एड्स दिन सप्ताह २००८ संयोजन समितीचे समन्वयाने आयोजित करावा.
- या मेळाव्यात पथनाटयाचे आयोजन करावे. यात जोखीमपूर्ण वर्तणूक, आरोग्यविषयक समस्या, एचआयव्ही/एड्स विषयी गैरसमजुती या विषयांचा समावेश असावा.
- ट्रकर्ससाठी या मेळाव्यात एचआयव्ही/एड्सवर माहिती देणारे प्रदर्शनाचे आयोजन करावे. यात **एचआयव्ही/एड्स** बाबत संदेश देणारे पोस्टर्स, बॅनर तयार करण्यात यावे. तसेच खास ट्रकर्ससाठी विशेष माशिसं साहित्याची (लिफलेट, पाम्प्लेट, पूस्तिका ) निर्मीती करुन वाटप करावे. जिल्हयातील

आयसीटीसी, एआरटी केंद्र इत्यादी सुविधांची माहिती देणारे पाम्प्लेट तयार करुन त्याच्या छायाप्रती काढाव्यात व मेळाव्यात वितरीत कराव्यात.

- मेळाव्यात येणा-या ट्रकर्सना एचआयव्ही/एड्स विषयी अधिक माहिती देण्यासाठी समुपदेशनाची सुविधा असावी.
- **या** मेळाव्याच्या **माध्यमातून** ट्रक / वाहन चालकांना **महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेच्या विविध कार्यक्रमांची माहिती देण्यात यावी. विशेषतः एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्र, ए.आर.टी. औषधोपचार** या **कार्यक्रमाबाबत तसेच लक्षगट हस्तक्षेप प्रकल्प व कम्युनिटी केअर सेंटर याबाबत विस्तृत माहिती देण्यात यावी.**
- **एचआयव्ही/एड्सबाबत** शास्त्रीय **माहिती देताना कंडोमच्या वापराबाबत तसेच कंडोमच्या प्रत्यक्ष वापराबाबत प्रात्यक्षिक देण्यात यावे.**
- **जागतिक एड्स दिन सप्ताह मोहिमेचे घोषवाक्य** ''नेतृत्व करा'' ''वचन पाळा-एड्स टाळा'' **याची संकल्पना विषद करावी. एचआयव्ही/एड्स नियंत्रणात** ट्रक/वाहन चालकांचे **जबाबदार वर्तन किती व्यापक व प्रभावी परिणाम करू शकतो याबाबत माहिती देण्यात यावी.**
- **या मेळाव्यात सहभागी झालेल्या** ट्रक/वाहन चालकांसाठी **भोजन व चहापानाची व्यवस्था करण्यात यावी. या मेळाव्यासाठी लागणारा खर्च महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था यांच्या वतीने जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या अधिनस्त असलेल्या अनुदानातून करण्यात यावा.**

**<u>आर्थिक तरतूद</u> - प्रत्येक जिल्हयासाठी रू. २५,०००/- (अक्षरी रूपये पंचेविस हजार मात्र)**

## ८. महिला मेळावा -

महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्या मदतीने **प्रत्येक जिल्ह्यात एक महिला मेळावा आयोजित करण्यात** यावा. **या मेळाव्याला महिला बचतगट, अंगणवाडी सेविका, महिला लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्या** या महिलांचा सहभाग असावा. या **महिला मेळाव्याला तज्ञ डॉक्टर, समुपदेशक व एचआयव्हीसह जगणाऱ्या एका व्यक्तिचे मार्गदर्शन** तसेच **एचआयव्ही/एड्स बाबतचा जनजागृतीपर कार्यक्रम मेळाव्यादरम्यान सादर करण्यात** यावे.

**आर्थिक तरतूद रु. २५,०००/- (रुपये पंचेविस हजार मात्र) हा खर्च माविम च्या अधिनस्त असणाऱ्या अनुदानातून करण्यात येणार आहे. त्यासाठी आवश्यक ते सहकार्य माविम च्या स्थानिक अधिकाऱ्यांना देण्यात यावे.**

## ९. डॉक्युमेंटेशन व छायाचित्रण :

- **जिल्हा शल्य चिकित्सक व अशासकिय संस्था यांच्या अधिनस्त अनुदानातून डॉक्युमेंटेशन व छायाचित्रणासाठी खर्च करण्यात यावा.**
- **जिल्हा शल्य चिकित्सक, अशासकिय संस्था यांनी स्वतंत्र डॉक्युमेंटेशन करावे.**
- **डॉक्युमेंटेशनमध्ये राबवलेला उपक्रम, मिळालेला प्रतिसाद, वर्तमान पत्रातून मिळालेली प्रसिद्धी, छायाचित्रांच्या मुळ प्रतींसह विस्तृत अहवाल सादर करावा.**
- **दि. ३१ डिसेंबर २००८ च्या आत कोणत्याही परिस्थितीत जिल्हा शल्य चिकित्सक व अशासकिय संस्था यांनी अंतीम अहवाल सादर करावा.**
- **उपयोगिता व विनीयोग प्रमाणपत्र अंतीम अहवालासोबत परंतू स्वतंत्र प्रमाणाकांच्या सत्य प्रतींसह दि. ३१ डिसेंबर२००८ पर्यंत सादर करावे. त्यानंतर सादर करण्यात आलेले विनियोग प्रमाण पत्र व उपयोगिता प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाहीत.**

*******

# प्रत्येक जिल्हानिहाय कार्यक्रमाची आर्थिक तरतूद

| SN | Circle | SN | District | Organizing Committee | Press Confernece | Rally | Meeting of Youth | Truckers | Documentation | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | **11** |
| 1 | **DD Thane** | 1 | Raigad | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | 2 | Ratnagiri | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | | **Total** | **4000** | **10000** | **30000** | **80000** | **50000** | **6000** | **180000** |
| 2 | **DD Nasik** | 3 | Nasik | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | 4 | Dhule | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | 5 | N'durbar | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | 6 | A'nagar | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | 7 | Jalgaon | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | | **Total** | **10000** | **25000** | **75000** | **200000** | **125000** | **15000** | **450000** |
| 3 | **DD Pune** | 8 | Pune | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | | Satara | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | | Sangli | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | | **Total** | **6000** | **15000** | **45000** | **120000** | **75000** | **9000** | **270000** |
| 4 | **DD Kolhapur** | | Kolhapur | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | | S'durg | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | | **Total** | **4000** | **10000** | **30000** | **80000** | **50000** | **6000** | **180000** |
| | | | Parbhani | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | | Hingoli | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | | **Total** | **4000** | **10000** | **30000** | **80000** | **50000** | **6000** | **180000** |
| 6 | **DD Latur** | | Latur | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | | Beed | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | | Nanded | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | | O'bad | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | | **Total** | **8000** | **20000** | **60000** | **120000** | **100000** | **12000** | **360000** |
| 7 | **DD Akola** | | Akola | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | | Amravati | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | | Buldhana | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | | Yavatmal | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | | Washim | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | | **Total** | **10000** | **25000** | **75000** | **200000** | **125000** | **15000** | **450000** |
| 8 | **DD Nagpur** | | C'pur | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | | Wardha | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | | Bhandara | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | | G'chiroli | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | | Gondia | 2000 | 5000 | 15000 | 40000 | 25000 | 3000 | 90000 |
| | | | **Total** | **10000** | **25000** | **75000** | **200000** | **125000** | **15000** | **450000** |
| **Grant Total** | | | | **56000** | **140000** | **420000** | **1040000** | **700000** | **2100000** | **2520000** |

**टिप :- ठाणे, औरंगाबाद, जालना, नागपूर व सोलापूर या जिल्हयांना ॲव्हर्ट सोसायटी कडून अनुदान प्राप्त होईल.**

## सिंहावलोकन
## एड्स नियंत्रण

१. एड्सशी मुकाबला करण्यासाठी जगातील सर्व देशांच्या आरोग्यमंत्र्यांची लंडन येथे बैठक आणि त्या दरम्यान जागतिक आरोग्य संघटनेकडून दि. १ डिसेंबर हा दिवस जागतिक एड्स दिन म्हणून आयोजित करण्याची घोषणा. (सन १९८८)

२. एड्समुळे जगातील किमान १० लक्ष बालकांनी आई किंवा वडील किंवा दोघेही एड्समुळे गमावले. (सन १९९०)

३. एड्स जनजागृतीचे बोधचिन्ह म्हणून लाल रिबनीला मान्यता. (सन १९९१)

४. आईकडून बाळाला होणाऱ्या एचआयव्हीच्या संसर्गासाठी पहिली उपचार पद्धती विकसित. (सन १९९४)

## महाराष्ट्र

१. राज्यात ऑक्टोंबर २००८ अखेर नोंदलेली एड्सची रूग्ण संख्या – ७७०५८.

२. राज्यातील ३२ जिल्हे एड्स संसर्गाच्या दृष्टीने अति जोखमीचे म्हणून घोषित.

३. महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेच्यावतीने राज्यातील जिल्हा रूग्णालये, वैद्यकीय महाविद्यालय रूग्णालये, ग्रामीण रूग्णालये तसेच महानगरपालिका रूग्णालयात मिळून संपूर्ण राज्यात एकूण ६०४ एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्रे कार्यान्वित. या व्यतिरिक्त मुंबई जिल्ह्यात ७४ एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्रे कार्यान्वित आहेत. या केंद्रात मोफत एचआयव्ही निदान रक्त तपासणीद्वारे करण्यात येते.

४. राज्यात २८ ठिकाणी मोफत एआरटी उपचारांची सुविधा व एका ठिकाणी लिंक एआरटी केंद्र सुरु आहे. एआरटी केंद्राची यादी सोबत जोडण्यात येत आहे.

५. राज्यात ४३ गुप्तरोग निदान केंद्रे कार्यान्वित आहेत. या व्यतिरिक्त मुंबईत २४ गुप्तरोग केंद्रे कार्यान्वित आहेत.

६. एचआयव्ही/एड्सच्या फैलावाच्या दृष्टीने जोखमीच्या गटातील लोकांसाठी काम करणाऱ्या अशासकीय संस्थांचे महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेने अनुदान लाभलेले राज्यात ४१ प्रकल्प कार्यरत. या व्यतिरिक्त मुंबई जिल्हा एड्स नियंत्रण संस्थेमार्फत २३, ॲव्हर्ट संस्थेमार्फत १३ व बील मिलेंडा गेट्स फाउंडेशन मार्फत ४२ प्रकल्प राबविण्यात येत आहेत.

७. सुरक्षित रक्त पुरवठा, एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्र, गुप्तरोग नियंत्रण कार्यक्रम, अँटीरिट्रोव्हायरल थेरेपी, प्रहरी सर्व्हेक्षण, निरोध वाटप कार्यक्रम, प्रशिक्षण, कौटुंबिक आरोग्य जागृती मोहिम, शालेय किशोरवस्था जीवन कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम, एचआयव्ही संसर्गित रूग्णांसाठी कम्युनिटी केअर सेंटर, एचआयव्ही संसर्गित रूग्णांसाठी ड्रॉप इन सेंटर, स्वयंसेवी संस्थांमार्फत हस्तक्षेप प्रकल्प व एड्स प्रतिबंधात्मक विविध जनजागृती कार्यक्रम इ. विविध कार्यक्रमांचे महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेच्या वतीने नियमीत आयोजन.

------------

# पत्रकार परिषदेचा मसूदा

**'पुढाकार घ्या,**
**एड्स विरोधात आपला आवाज बुलंद करा. '**

**जागतिक एड्स दिनाच्या पूर्व-संध्येला असा दृढ संकल्प करून महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था राज्यभर आयोजित होणाऱ्या जागतिक एड्स नियंत्रण सप्ताहास सुरूवात करीत आहे. जागतिक आरोग्य सप्ताहानिमित्त दि. १ डिसेंबर २००८ ते ७ डिसेंबर २००८ या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.**

**जागतिक आरोग्य संघटनेने सर्वप्रथम १९८८ साली जागतिक एड्स दिनाची घोषणा केली. त्यानंतर पुढे दरवर्षी दि. १ डिसेंबर हा दिवस संपूर्ण जगभर एड्स दिन म्हणून आयोजित केला जातो. एड्स विरूद्धच्या लढ्यामध्ये सहभागी असलेल्या संस्था, व्यक्ती व इतर सर्वजण यांना वर्षभर केलेल्या कामाबाबतच्या माहितीची देवाण-घेवाण करण्यासाठी, तसेच आपापल्या अनुभवांचे आदान-प्रदान करण्यासाठी आणि एकत्रितपणे एड्स विरोधी लढ्याची पुढील भूमिका ठरविण्यासाठी एड्स दिनाचे आयोजन जगभरात केले जाते.**

**महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, व ॲव्हर्ट सोसायटी यांच्या वतीने राज्याच्या सर्व जिल्ह्यामध्ये पुढील उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.**

१. **रॅली - १ डिसेंबर २००८ रोजी जागतिक एड्स नियंत्रण दिन असल्या कारणास्तव या दिवशी** रॅलीचे **आयोजन करण्यात येईल.** या रॅलीत विशेषत: **महाविद्यालयीन विद्यार्थी, आरोग्य विभाग व शासनाच्या विविध कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, सेवाभावी संस्था, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर नेते यांचा सहभाग असेल.**

२. **युवक मेळावा -** महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था व ॲव्हर्ट सोसायटी यांच्या वतीने महाविद्यालयीन युवक युवतीमध्ये जनजागृती करण्यासाठी प्रत्येक जिल्हयात युवक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात युवकांमध्ये एचआयव्ही/एड्स विषयी असणारी गैरसमजुती, आरोग्य विषयक समस्या या विषयांवर मार्गदर्शन करण्यासाठी वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ मंडळीचे व्याख्यान, पॉझीटिव्ह स्पिकरशी सुसंवाद साधुन दिला जाईल. युवकांना एचआयव्ही/एड्स बाबत योग्य माहिती देण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाईल. कार्यक्रमाच्या शेवटी त्यांच्या प्रश्नोत्तराच्या माध्यमातून त्यांना मार्गदर्शन केले जाईल. इच्छूक युवकांना जिल्हयातील आयसीटीसी, एआरटी केंद्रांवर प्रत्यक्ष भेट देऊन तेथे पूरविल्या जाणा-या सुविधा व कार्यप्रणाली विषयी मार्गदर्शन केले जाईल.

३. **ट्रकर्स मेळावा-** ट्रक / वाहनचालकांमध्ये जनजागृती करण्यासाठी जिल्हयातील ट्रक मालक, चालक संघटनेच्या मदतीने महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था व ॲव्हर्ट सोसायटी यांच्या वतीने ट्रकर्स मेळाव्याचे आयोजन केले आहे. या मेळाव्यात जनजागृतीपर पथनाटयाचे आयोजनही केले

आहे तसेच एचआयव्ही/एड्स विषयी माहिती देणारे प्रदर्शन, जिल्हयातील एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्र, एआरटी केंद्र, गुप्तरोग निवारण केंद्र इत्यादी सुविधांविषयी माहिती देणारे माशिसं साहित्याचे वितरणही केले जाईल. तसेच समुपदेशनाची सुविधा असेल.

४. **भगिनी मेळावा - (शरीर विक्रय करणाऱ्या महिलांसाठी मेळावा)**
**देह विक्रय करण्याऱ्या महिलांमध्ये जनजागृती करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेमार्फत व ॲव्हर्ट सोसायटीमार्फत अनुदानीत अशासकीय संस्थेच्या माध्यमातून या मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार आहे. यात मेळाव्यात सहभागी होणाऱ्या शरीर विक्रय करणाऱ्या महिलांना एचआयव्ही/एड्सबाबतची शास्त्रिय माहिती महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेचे व ॲव्हर्ट सोसायटीचे कार्य, एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्राबद्दलची माहिती, गुप्तरोग नियंत्रण केंद्रांबद्दलची माहिती, पालकांकडून अर्भकास होणारा एचआयव्ही संसर्ग नियंत्रण कार्यक्रम, एचआयव्ही एड्स नियंत्रणात स्त्रियांची भुमिका याबाबत सकारात्मक दृष्टिकोनातून मार्गदर्शन करण्यात येईल. या मेळाव्यात एचआयव्ही/एड्स बाबत प्रश्न-उत्तरांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल. निरोधचा वापर व एचआयव्ही/एड्स नियंत्रणात निरोधचे महत्व याबाबत माहिती देण्यात येईल.**

५. **महिला मेळावा -** महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्या मदतीने **प्रत्येक जिल्ह्यात एक महिला मेळावा आयोजित करण्यात येईल. या मेळाव्याला महिला बचतगट, अंगणवाडी सेविका, महिला लोकप्रतिनिधी व आशा कार्यकर्त्या अशा महिला उपस्थित राहतील. महिला मेळाव्याला तज्ञ डॉक्टर, समुपदेशक व एचआयव्हीसह जगणाऱ्या एका व्यक्तिचे मार्गदर्शन लाभेल. त्याशिवाय एचआयव्ही/एड्स बाबतचा जनजागृतीपर कार्यक्रम मेळाव्यादरम्यान सादर करण्यात येईल.**

**ज्या संस्था, व्यक्ति, विद्यार्थी यांना जागतिक एड्स नियंत्रण दिन सप्ताह मोहिमेत सहभाग घ्यावयाचा आहे त्यांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याशी संपर्क साधावा असे अवाहन महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेचे प्रकल्प संचालक श्री. प्रकाश साबदे, भा.प्र.से. व जागतिक एड्स दिन नियंत्रण सप्ताह मोहिम जिल्हा संयोजन समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांनी केले आहे. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जागतिक एड्स नियंत्रण सप्ताह संयोजन समितीचे गठण करण्यात आले आहे. जिल्हा शल्य चिकित्सक हे या समितीचे पदसिद्ध सचिव असतील. या समितीत शासनाच्या विविध कार्यालयांच्या जिल्हा प्रमुखांचा व सेवाभावी संस्थांच्या प्रतिनिधींचा समावेश करण्यात आला आहे.**

## ६. जागतिक एड्स दिन २००८ -जागतिक एड्स अभियान

**जागतिक एड्स अभियान जगातील सर्व ठिकाणच्या एड्स विरोधी मोहिमांना जोडण्याचे व बळकट करण्याचे कार्य करते. जगातील सर्व राष्ट्रांतील एड्स प्रतिबंधाच्या धोरणांचा पाठपुरावा करुन जागतिक नेतृत्वाला त्यांच्या एड्स संबंधी वचन पूर्तीसाठी एकत्र आणून परस्पर सहकार्य घडवून आणण्यासाठी हे अभियान कार्यरत आहे.**

**१ डिसेंबर हा जागतिक एड्स दिवस पाळून सर्व जग एड्स विरोधासाठी आपली कटिबध्दता व्यक्त करते हा देखील याच एड्स विरोधी अभियानाचा भाग आहे.**

**जागतिक एड्स दिनाची मध्यवर्ती संकल्पना – 'नेतृत्व'**

'पुढाकार घ्या' **या मागील वर्षाच्या संकल्पनेतून पुढे जाऊन २००८ व २००९ साठी 'नेतृत्व' ही जागतिक एड्स दिनासाठी संकल्पना निश्चित करण्यात आलेली आहे. "वचन पाळा, एड्स टाळा" हे जागतिक एड्स विरोधी अभियानाचे घोषवाक्य आहे.**

**'नेतृत्व'** या संकल्परनेव्दारे सर्व स्तरावरील नेतृत्वाला एड्सला रोखण्याचे आवाहन करण्यात येत आहे. नेतृत्व ही यावर्षीची मध्यवर्ती संकल्पना एड्स विरुद्धच्या लढयाबाबत यापूर्वी व्यक्त करण्यात आलेले निर्धार व त्यांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणी दरम्यान राहिलेल्या त्रुटी यावर भर देते. **'नेतृत्व'** या संकल्पनेव्दाने व्यक्ती, संस्था, शासन या सर्वांनाच एड्स विरोधी लढयात पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सन २०१० पर्यंत सर्वांसाठी समग्र प्रतिबंध कार्यक्रम, उपचार, निगा व देशभाल उपलब्ध करुन देण्याचे ध्येय आपल्याला गाठायचे आहे. त्यासाठी नेतृत्व व कृती करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. एचआयव्ही/एड्स मुळे कुणाच्याही मानवाधिकारांचे उल्लंघन होणार नाही व त्यामुळे त्यांना कलंक वा भेदभावाची वागणुक मिळणार नाही यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीला जागरुक होऊन या लढयात नेतृत्व करण्याची गरज आहे. म्हणूनच आज नेतृत्व करुन समाजाला सक्षम बनविण्याची व एचआयव्ही/एड्सला रोखण्याचे ध्येय गाठण्याची वेळ आली आहे.

**एड्स विरोधी अभियानासाठी सर्व स्तरांवरील व्यक्तिंनी शाळा-कॉलेजात, घरात, कार्यालयांमध्ये व धार्मिक ठिकाणी देखील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पुढाकार घेऊन नेतृत्व करणे गरजेचे आहे.**

**२००८ व २००९ या वर्षी जागतिक एड्स दिनाची 'नेतृत्व' ही संकल्पना घेतल्याने समाजाच्या विविध स्तरांवर नेतृत्व करणाऱ्या व्यक्तिंना एड्स विरोधी लढा तीव्र करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल.**

।।।।।।।।

# महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण कार्यक्रमाची संक्षिप्त टिप्पणी

एच.आय.व्ही. या विषाणूच्या संसर्गाने एड्स हा रोग होतो. या रोगावर सध्या तरी कोणतंही औषध वा लस उपलब्ध नाही. या रोगाचा प्रादुर्भाव संपूर्ण जगात झाला असून असुरक्षित लैंगिक संबंधाद्वारे या रोगाचा सर्वाधिक वेगाने प्रसार होतो असं निष्पन्न झालं आहे.

भारतामध्ये १९८६ साली या रोगाचा पहिला रूग्ण आढळल्याची नोंद आहे. एच.आय.व्ही. बाधित व्यक्तींमध्ये सर्वाधिक संख्या १५ ते ३५ या वयोगटातील आहे. याचा अर्थ या रोगाने उत्पादनक्षम असणारी तरूण पिढी बरबाद होते आहे. त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवरही त्याचे गंभीर परिणाम होणं अपरिहार्य आहे.

असुरक्षित लैंगिक संबंध, एच.आय.व्ही. बाधित व्यक्तीचं रक्त वा रक्त घटक दुसऱ्या व्यक्तीस दिल्याने आणि एच.आय.व्ही. बाधित गरोदर मातेकडून गर्भाला या तीन मार्गांनी या रोगाचा प्रसार होतो. या रोगाला प्रतिबंध करण्यासाठी असुरक्षित लैंगिक संबंध टाळणं, निरोधचा योग्य प्रकारे वापर करणं हा सर्वाधिक प्रभावी उपाय आहे. त्यासाठी लैंगिक वर्तणुकीत कायमस्वरूपी बदल करणं आवश्यक आहे.

एच.आय.व्ही.चा संसर्ग झाल्यानंतर व्यक्तीच्या शरीरातील रोगप्रतिकार शक्तीचा ऱ्हास होऊ लागतो. रोगप्रतिकार शक्तीचा पूर्णपणे ऱ्हास झाल्यानंतर अन्य सामान्य रोगांचे जंतू शरीरावर हल्ला करतात. त्यामुळे अनेक रोगांची लक्षणे दिसू लागतात. या स्थितीला एड्स म्हणतात. एच.आय.व्ही.ची बाधा झाल्यापासून एड्स होईपर्यंतचा काळ प्रत्येक रूग्णाच्या रोगप्रतिकार क्षमतेवर अवलंबून असतो. हा काळ सर्वसाधारणपणे १० ते १२ वर्षांचा असतो. मात्र या कालावधीत एच.आय.व्ही. बाधित व्यक्ती सर्वसाधारण निरोगी व्यक्तीप्रमाणेच दिसते. एच.आय.व्ही.चा संसर्ग असा अदृश्य असल्याने असुरक्षित लैंगिक संबंधाद्वारे या व्यक्तीकडून एच.आय.व्ही.ची बाधा अन्य व्यक्तींना होते. त्यामुळेच अतिशय वेगानं या रोगाचा प्रसार होतो.

विशेषतः महिला या रोगाला सहजपणे बळी पडतात. समाजामध्ये स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या विषम वागणुकीमुळे, त्यांना या रोगाची माहिती नसते, या रोगाला प्रतिबंध करण्याचे उपाय त्यांना ठाऊक नसतात. असुरक्षित लैंगिक संबंध टाळण्यासाठी जोडीदाराने निरोधचा वापर करावा असा आग्रह धरण्यास त्या असमर्थ असतात. यामुळेच महिला या संसर्गाला सहजपणे बळी पडतात.

निरक्षरता, अज्ञान, खेडयांकडून शहरांकडे मोठया प्रमाणावर होणारे स्थलांतर, बेरोजगारी या कारणांमुळेही एच.आय.व्ही.च्या संसर्गात वाढ होत आहे. देहविक्रय करणाऱ्या व्यक्ती-वेश्या, हिजडे, समलिंगी संभोग करणारे यांनाच एच.आय.व्ही.ची लागण होण्याचा धोका आहे अशी समजूत प्रारंभीच्या काळात होती. मात्र आता या रोगाने समाजाच्या सर्व थरांमध्ये आणि वयोगटांमध्ये हातपाय पसरले आहेत.

## एच.आय.व्ही./एड्स नियंत्रण धोरण

एच.आय.व्ही./एड्सचं भयंकर संकट रोखण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं, ''नॅशनल एड्स कंट्रोल ऑर्गनायझेशन'' (नॅको) या राष्ट्रीय पातळीवरील संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून एड्सचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी देशातील सर्व राज्ये, केंद्रशासित प्रदेशांबरोबरच अहमदाबाद, चेन्नई आणि मुंबई या ठिकाणी एड्स नियंत्रण संस्थांची स्थापना करण्यात आली.

एड्सचा प्रादुर्भाव रोखणं व तो नियंत्रित करणं यासाठी नॅशनल एड्स कंट्रोल ऑर्गनायझेशननं २००२ साली नवीन राष्ट्रीय एड्स नियंत्रण धोरण जाहीर केलं. या धोरणामध्ये खालील महत्वाच्या उद्दिष्टांचा समावेश करण्यात आलेला आहे.

- एच.आय.व्ही./एड्स चा प्रादुर्भाव पूर्णतः थांबविणे आणि या रोगाची वैयक्तिक आणि सामाजिक तीव्रता कमी करणे.
- एड्स नियंत्रित करण्यासाठी राष्ट्रीय प्रयत्न करण्याची भावना प्रत्येकाच्या मनात निर्माण करणे. विशेषतः हे प्रयत्न केंद्र सरकार, राज्य सरकारे, स्थानिक स्वराज्य संस्था, पंचायत राज संस्था, सार्वजनिक उपक्रम, खाजगी कंपन्या, आदी पातळ्यांवर करणे.
- एच.आय.व्ही./एड्सचा प्रसार रोखणं आणि, एच.आय.व्ही./एड्स बाधित व्यक्तींची काळजी घेणं, त्यांना मानसिक आधार देणं, आरोग्यविषयक सुविधा, शिक्षण आणि रोजगार या त्यांच्या मानवी हक्कांचं रक्षण करणं. त्यासाठी पूरक असं सामाजिक, आर्थिक वातावरण निर्माण करणं.
- या कार्यक्रमांमध्ये सहभागी होणारी राज्य सरकारे, महानगरपालिका, पंचायत संस्था आणि अग्रगण्य स्वयंसेवी संस्था यांच्या पातळीवर कार्यक्रम व्यवस्थापन अधिक मजबूत करणं.
- प्रजनन, बाल आरोग्य, टी.बी. नियंत्रण कार्यक्रम, एकात्मिक बाल विकास योजना आणि प्राथमिक आरोग्य सेवा आदी राष्ट्रीय कार्यक्रमाच्या बरोबरीनं एच.आय.व्ही./एड्स नियंत्रण कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना सुसूत्रता राखणं.
- महिला, बालके आणि समाजातील दुर्बल घटकांना उपलब्ध असणाऱ्या आरोग्य, शिक्षण या सुविधांचा दर्जा वाढवणं, त्यांचा आर्थिक स्तर वाढवून या रोगाच्या प्रादुर्भावापासून त्यांचा बचाव करणं.
- लोकांमध्ये जागृती निर्माण करून त्यांना एच.आय.व्ही.च्या संसर्गापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी कोणत्या गोष्टींची काळजी घ्यायला हवी या विषयी माहिती देणं.
- लैंगिक संबंधांद्वारा पसरणाऱ्या रोगांना आळा घालण्यासाठी निरोधचा प्रसार करणं.
- सुरक्षित रक्त आणि रक्त घटक उपलब्ध करून देणं.
- भारतीय नीतीमुल्यांची जपणूक करण्याविषयी प्रोत्साहित करणं.
- एच.आय.व्ही./एड्स बाधित व्यक्तींना आधार देण्यासाठी पूरक असं वातावरण निर्माण करणं.
- सामाजिक स्वास्थ्य केंद्राच्या (कम्युनिटी हेल्थ केअर सेंटर) माध्यमातून एच.आय.व्ही./एड्स बाधित व्यक्तींना आजारपणाच्या काळात आरोग्य सेवा पुरविणं.
- एच.आय.व्ही./एड्स बाधित व्यक्तींना आरोग्य सेवा पुरविणं आणि समाजाकडून त्यांच्या वाटयाला येणारी अवहेलना, त्यांच्यावर होणारा अन्याय थांबविणं यावर लक्ष केंद्रित करणं.

- देशातील रक्तदान कार्यक्रमाच्या माध्यमातून आवश्यक आणि सुरक्षित रक्त उपलब्ध करून देणं.
- एच.आय.व्ही./एड्‌सचा प्रादुर्भाव होण्याविषयी लोकांमध्ये, विशेषत: विद्यार्थी, युवक आणि लैंगिकदृष्टया कार्यक्षम असणाऱ्या घटकांमध्ये जनजागरण मोहीम राबवून या रोगाचा प्रादुर्भाव कसा होतो, त्याचं स्वरूप आणि तो कसा पसरतो याविषयी उपयुक्त माहिती पुरविणं. जेणेकरून त्यांच्या वर्तनामध्ये सकारात्मक बदल होऊ शकेल.

## महाराष्ट्र राज्य एड्‌स नियंत्रण संस्था

एच.आय.व्ही./एड्‌स या रोगाला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र राज्य एड्‌स नियंत्रण सोसायटी राज्यातील ३३ जिल्हयांमध्ये कार्यरत आहे. राज्य सरकारच्या आरोग्य विभागाच्या यंत्रणेंतर्गत काम करणाऱ्या या संस्थेच्या माध्यमातून विविध आघाडयांवर अनेक कार्यक्रमांच्याद्वारे कार्य केले जात आहे.

१९८६ सालापासून महाराष्ट्रात एचआयव्ही/एड्‌स नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत असला तरी सन १९९२ सालापासून तो व्यापक प्रमाणावर राबविण्यात येत आहे. आज महाराष्ट्रातील ३३ जिल्ह्यांत यशस्वीपणे एड्‌स नियंत्रण कार्यक्रम राबविण्यामध्ये महाराष्ट्र राज्य एड्‌स नियंत्रण संस्थेने आघाडी घेतली आहे.

- **गुप्तरोग नियंत्रण कार्यक्रम :**

  एड्‌सवर कोणतंही औषध वा लस उपलब्ध नसली तरी लैंगिक संबंधातून पसरणारे गुप्तरोग पूर्णपणे बरे होऊ शकतात. बऱ्याचवेळा अशा रोगांकडे दुर्लक्ष केलं तरी किंवा त्यावर चुकीचे उपचार झाले तरीही एड्‌सची लागण होण्याचा धोका संभवतो. ही परिस्थिती टाळण्यासाठी महाराष्ट्र राज्य एड्‌स नियंत्रण संस्थेने लैंगिक संबंधातून निर्माण होणाऱ्या रोगांवर उपचार करण्यासाठी गुप्तरोग निदान केंद्रे (सेक्शुअली ट्रान्समिटेड डिसीज् क्लिनिक्स) सुरू केली आहेत. या ठिकाणी मोफत उपचार आणि सल्ला दिला जातो.
- **रक्त सुरक्षा (Blood Safety)**

  एच.आय.व्ही. बाधित रक्तामधून होणारा एड्‌सचा प्रादुर्भाव / प्रसार रोखण्यासाठी राज्यात २५० सरकारमान्य रक्तपेढयांमधील यंत्रणा अद्ययावत करण्यात आली आहे. रक्तदानाचे कार्यक्रम आयोजित करून रक्तदात्यांकडून प्राप्त झालेल्या रक्ताची एच.आय.व्ही. आणि इतर रोगांसाठीही तपासणी केली जाते. तपासणीमध्ये रक्तात गुप्तरोग, एच.आय.व्ही., कावीळ, मलेरिया यापैकी कोणत्याही आजाराचे विषाणू / जीवाणू आढळून आल्यास ते रक्त नष्ट केले जाते. रक्त सुरक्षेच्या आघाडीवर महाराष्ट्राने केलेल्या कामगिरीची दखल राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आली आहे. राज्यामध्ये स्वेच्छा रक्तदानाचे प्रमाण ७० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. स्वेच्छा रक्तदानातून संकलित झालेल्या रक्तातील एचआयव्ही बाधेचं प्रमाण १९९९ साली १.४ टक्के होतं. २००३ साली हे प्रमाण ०.७ टक्के एवढे कमी करण्यात राज्याला यश मिळाले आहे. हे प्रमाण ०.१ टक्के पर्यंत कमी करण्याचे उद्दीष्ट आहे.

- **एकात्मिक सल्ला व रक्त तपासणी केंद्र**

**प्रत्येक व्यक्तीची सक्तीची एच.आय.व्ही.साठी तपासणी करणं हे कायदेशीरदृष्टया बंधनकारक नसल्यानं कोणतीही संघटना अथवा संस्था कुणालाही रक्त तपासणीची सक्ती करू शकत नाही. तथापि ज्यांना एच.आय.व्ही.साठी आपल्या रक्ताची तपासणी करायची असेल तर जवळच्या जिल्हा रूग्णालयात, वैद्यकीय महाविद्यालय रूग्णालयात, ग्रामीण रूग्णालयाात तसेच महानगरपालिका रूग्णालयात (३३ जिल्हयांमध्ये) उघडण्यात आलेल्या एकात्मिक सल्ला व रक्त तपासणी केंद्रात जाऊन आपल्या रक्ताची तपासणी मोफत करु शकतात. या केंद्रांवर चाचणीपूर्व व चाचणीनंतर समुपदेशनही केलं जातं. त्याच बरोबर समुपदेशन करून तिला मानसिक आधार देणं, योग्य सल्ला आणि मार्गदर्शन करणं यासाठी प्रशिक्षित समुपदेशक नियुक्त करण्यात आले आहेत.** सध्या राज्यात ६०४ केंद्र कार्यान्वित आहेत.

**एच.आय.व्ही. ची बाधा झालेल्या व्यक्तीला या केंद्रांवर मार्गदर्शन केलं जातंच पण त्यांच्या नातेवाईकांनाही मार्गदर्शन केलं जातं.**

- **पालकांकडून अर्भकाला होणारा एचआयव्ही प्रतिबंध कार्यक्रम**

**गरोदर मातांनी एचआयव्हीचा संसर्ग होऊ नये यासाठी काय काळजी घ्यावी, एचआयव्ही संसर्ग झाला असल्यास मूल जन्माला घालण्याबाबत शास्त्रीय माहितीवर आधारीत निर्णय घ्यावा, नेविरॅपिन या औषधाचा डोस गरोदर मातेला आणि नवजात अर्भकाला दिल्यास एचआयव्हीची बाधा होण्याची शक्यता किती प्रमाणात कमी होते, इत्यादी मुद्यांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यासाठी सर्व जिल्हा रूग्णालयात समुपदेशनाची व्यवस्था करण्यात आली आहे. डॉक्टर व अन्य सेवकवर्गाला प्रशिक्षण या कार्यक्रमांतर्गत देण्यात येत आहे.**

- **लक्ष्यगट हस्तक्षेप प्रकल्प :**

**देहविक्रय करणाऱ्या महिला, समलिंगी संभोग करणाऱ्या पुरुषांसाठी, अशा गटातील व्यक्तींना एचआयव्हीची लागण होण्याचा धोका सर्वाधिक असतो. अशा जोखीम गटातील व्यक्तींच्या लैंगिक वर्तणुकीत बदल घडवून आणण्यासाठी स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने राज्यात प्रकल्प राबवले जात आहेत. ही संख्या १०० वर नेण्याचे उद्दीष्ट आहे.**

- **निरोधचा प्रसार**

**गुप्तरोग आणि एड्‌सला पायबंद घालण्याचा एक महत्वपूर्ण उपाय म्हणून निरोधचा प्रसार करण्याचं धोरण अवलंबिण्यात आलं आहे. यासाठी लैंगिक रोग नियंत्रण केंद्रे, कुटुंब कल्याण विभाग आणि स्वयंसेवी संस्थांच्यामार्फत निरोधचं वाटप करण्यात येतं. जोखमीची लैंगिक वर्तणुक असणाऱ्या समाजघटकांनी निरोधचा वापर करणं अनिवार्य आहे. मात्र त्यांच्या वर्तणुकीत बदल घडवून आणण्यासाठीही संस्था कार्यरत आहे.**

- **प्रशिक्षण कार्यक्रम**

  एचआयव्ही/एड्स रूग्णांवर योग्य उपचार केले जावेत, त्यांची देखभाल केली जावी यासाठी प्रत्येक जिल्हा रूग्णालयात डॉक्टर्स, परिचारिका यांना प्रशिक्षित करण्याचा कार्यक्रम राबविला जातो. त्याचप्रमाणे सर्व शासकीय रूग्णालयात एच.आय.व्ही. बाधित व्यक्तींवर कसे उपचार करावेत, उपचार घेताना कोणती काळजी घ्यावी याविषयीचे प्रशिक्षण दिले जाते.

- **कम्युनिटी केअर सेंटर्स**

  पाचगणी येथे एड्स रूग्णांसाठी कम्युनिटी केअर सेंटर चालविण्यात येतं. जिल्हयांमध्ये एड्सचा प्रादुर्भाव सर्वाधिक प्रमाणात आहे त्या ठिकाणी अशी केंद्रे सुरू करण्याचा विचार आहे. या केंद्रांमध्ये एच.आय.व्ही. बाधित व्यक्तींच्या आजारावर उपचार केले जातातच परंतु त्यांच्या कुटुंबियांनाही रूग्णाची काळजी कशी घ्यावी याविषयी मार्गदर्शन केलं जातं.

## एच.आय.व्ही./टी.बी. ससंसर्ग

जगातील एकूण टी.बी. रूग्णांपैकी एक तृतीयांश रूग्ण हे भारतात आहेत. देशातील जवळपास ४० टक्के लोकसंख्येला कमी अधिक प्रमाणात टी.बी.चा संसर्ग झाला आहे. देशातील एक सामान्य संसर्गजन्य रोग असलेल्या टी.बी. या रोगाची लागण एच.आय.व्ही/एड्सच्या संपर्कात आल्यानंतर मोठया प्रमाणात पसरायला लागली आहे. परिणामी एच.आय.व्ही/एड्स बाधित व्यक्तीस टी.बी. ची बाधा होतेच पण एक रूग्ण आपल्या आजुबाजूच्या किमान १८ ते २० लोकांना टी.बी. ची लागण करतो. गेल्या काही वर्षांमध्ये एड्समुळे टी.बी. ची लागण वाढल्याचे प्रमाण कितीतरी पटीने वाढले आहे.

एच.आय.व्ही. च्या विषाणूंनी आपल्या शरिरात प्रवेश मिळविल्यानंतर ते आपली रोगप्रतिकार शक्तीच नष्ट करून टाकतात. परिणामी टी.बी. सारखा रोग सहजपणे होतो. यामुळं एच.आय.व्ही/एड्स सह टी.बी. ची बाधा झालेला रूग्ण आपली जीवन यात्रा लवकर संपवितो. क्षयरोगाला आळा घालण्यासाठी, डायरेक्टली ऑब्झर्व्हड ट्रिटमेंट (डॉट) हा कार्यक्रम संपूर्ण राज्यात राबवला जातो. या कार्यक्रमांतर्गत क्षय रूग्णाला तपासून त्याने औषध घेतल्याची खात्री केली जाते. अनेक रूग्ण-रोग संपूर्ण बरा होण्यापूर्वीच औषध घेणे बंद करतात, म्हणून 'डॉट'ची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे.

## एच.आय.व्ही./एड्स - मानवी हक्क आणि सामाजिक प्रश्न

कायदेशीर आणि सामाजिक प्रश्नांचा पाया समाजाच्या नैतिक तत्वांवर उभा असतो. लैंगिकतेबाबतच्या समाजाच्या नैतिक धारणा कायद्यामध्ये प्रतिबिंबित असतात. एड्स हा आजार व्यक्तीच्या फक्त आरोग्याशी निगडीत नसून त्यात अनेक मनोसामाजिक आणि कायदेशीर बाबी निगडीत आहेत.

एखाद्या व्यक्तीला एच.आय.व्ही. संसर्ग झाला तर ती बाब सामाजिकदृष्टया कलंक समजली जाते. त्यामुळे त्या व्यक्तीची समाजात अवहेलना होते. अनेकदा एच.आय.व्ही. बाधित व्यक्तीचा मृत्यू या अवहेलनेमुळेच लवकर ओढवतो. केंद्रसरकारने एप्रिल २००२ मध्ये जाहीर केलेल्या एड्स नियंत्रण धोरणामध्ये म्हणूनच एच.आय.व्ही. बाधित व्यक्तींना संरक्षण देणं तसेच त्यांची योग्य काळजी घेणं, या विषयाला सर्वाधिक महत्व दिलं आहे.

- अन्य असाध्य रोगांप्रमाणेच एड्स हा एक आजार आहे. त्यामुळे एच.आय.व्ही. बाधित व्यक्तीला वा एड्स रूग्णाला सामाजिक कलंक म्हणून दूर लोटणे, हा अन्याय आहे.
- भारतीय राज्यघटनेनुसार आरोग्याचा हक्क, मूलभूत हक्क समजला जातो. त्यामुळे एच.आय.व्ही. बाधित व्यक्तीला इस्पितळात प्रवेश नाकारणं वा उपचार करण्यास नकार देणं हा गुन्हा आहे.
- एखादी व्यक्ती एच.आय.व्ही. बाधित आहे म्हणून तिला नोकरीवरून काढून टाकता येत नाही.
- एच.आय.व्ही.चा संसर्ग झाला आहे की नाही हे केवळ रक्त चाचणीनंतरच समजू शकतं. मात्र रोगनिदानासाठी केल्या जाणाऱ्या चाचण्या ऐच्छिक असतात. व्यक्तीची पूर्वसंमती घेऊनच चाचणी करणं कायद्यानं बंधनकारक आहे. केल्या जाणाऱ्या चाचणीची संपूर्ण माहिती संबंधीत व्यक्तीला देणं कायद्याने बंधनकारक असतं.
- अशा चाचणीअंती एखादी व्यक्ती एच.आय.व्ही. बाधित असल्याचं निष्पन्न झालं तर सदर निकाल गुप्त ठेवणं बंधनकारक आहे. एच.आय.व्ही. बाधित व्यक्ती आणि तिच्या जवळच्या संपर्कातील व्यक्ती यांना या चाचणीचा निकाल सांगण्यासाठीच बाधित व्यक्तीचं समुपदेशन केलं जातं. एच.आय.व्ही. चाचणीच्या संबंधात गोपनीयतेला अनन्यसाधारण महत्व आहे. कारण या तत्वाचं पालन न झाल्यास सदर व्यक्तीला सामाजिक अवहेलनेला बळी पडावं लागतं.
- रक्तपेढीला संकलित झालेल्या रक्ताच्या चाचण्या करणं बंधनकारक आहे. अशा चाचणीमध्ये एखाद्या व्यक्तीच्या रक्तात एच.आय.व्ही.चे विषाणू आढळले तर त्या रक्ताची सुरक्षितपणे विल्हेवाट लावली जाते.
- एच.आय.व्ही. बाधित व्यक्तींच्या मानवी हक्कांची जपणूक करणं, त्यांची अवहेलना होऊ न देणं, त्यांना आवश्यक त्या सर्व सेवा-सुविधा पुरवणं, मानसिक आधार देणं ही समाजाची जबाबदारी आहे.

* * * * * *

## AIDS Case Surveillance Report : Aug. 1986 to Oct 08

| Sr. No. | Center | Reported AIDS Cases | | | Reported AIDS Deaths | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | M | F | T | M | F | T |
| 1 | Raigad | 520 | 182 | 702 | 27 | 15 | 42 |
| 2 | Ratnagiri | 561 | 228 | 789 | 56 | 21 | 77 |
| 3 | Thane | 1251 | 545 | 1796 | 157 | 63 | 220 |
| 4 | Ahmednagar | 464 | 295 | 759 | 32 | 22 | 54 |
| 5 | Nasik | 326 | 157 | 483 | 84 | 37 | 121 |
| 6 | Dhule | 787 | 420 | 1207 | 90 | 27 | 117 |
| 7 | Jalgaon | 264 | 75 | 339 | 6 | 3 | 9 |
| 8 | Nandurbar | 311 | 134 | 445 | 22 | 8 | 30 |
| 9 | Pune | 6732 | 5704 | 12436 | 282 | 194 | 476 |
| 10 | Satara | 1053 | 516 | 1569 | 155 | 34 | 189 |
| 11 | Solapur | 681 | 386 | 1067 | 58 | 14 | 72 |
| 12 | Kolhapur | 1543 | 943 | 2486 | 91 | 26 | 117 |
| 13 | Sangli | 2718 | 1171 | 3889 | 499 | 240 | 739 |
| 14 | Sindhudurg | 112 | 61 | 173 | 36 | 14 | 50 |
| 15 | Aurangabad | 1130 | 280 | 1410 | 193 | 54 | 247 |
| 16 | Beed | 255 | 133 | 388 | 11 | 2 | 13 |
| 17 | Jalna | 85 | 29 | 114 | 7 | 1 | 8 |
| 18 | Nanded | 254 | 115 | 369 | 8 | 5 | 13 |
| 19 | O'bad | 215 | 151 | 366 | 8 | 3 | 11 |
| 20 | Latur | 1533 | 720 | 2253 | 63 | 14 | 77 |
| 21 | Hingoli | 124 | 72 | 196 | 14 | 5 | 19 |
| 22 | Parbhani | 346 | 115 | 461 | 24 | 3 | 27 |
| 23 | Akola | 325 | 57 | 382 | 23 | 3 | 26 |
| 24 | Amravati | 55 | 20 | 75 | 11 | 3 | 14 |
| 25 | Buldhana | 266 | 84 | 350 | 13 | 1 | 14 |
| 26 | Washim | 39 | 15 | 54 | 3 | 2 | 5 |
| 27 | Yavatmal | 178 | 49 | 227 | 51 | 6 | 57 |
| 28 | Bhandara | 186 | 92 | 278 | 16 | 4 | 20 |
| 29 | Chandrapur | 558 | 196 | 754 | 39 | 10 | 49 |
| 30 | Gadchiroli | 146 | 49 | 195 | 17 | 8 | 25 |
| 31 | Nagpur | 631 | 196 | 827 | 55 | 18 | 73 |
| 32 | Wardha | 33 | 21 | 54 | 6 | 5 | 11 |
| 33 | Gondia | 94 | 54 | 148 | 25 | 5 | 30 |
| 34 | Mumbai | 27849 | 12168 | 40017 | 1236 | 513 | 1749 |
| | **Total** | **51625** | **25433** | **77058** | **3418** | **1383** | **4801** |

## HIV / AIDS STATUS IN MAHARASHTRA

| Sr. No. | Indicator | Aug.1986 to Dec. 2006 | January to Oct 2008 | | | Aug.1986 to Oct 2008 |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | Ex-Mumbai | Mumbai | Total | |
| 1 | No. of Blood units screened | 9930178 | 604505 | 175840 | **780345** | **11714766** |
| 2 | ELISA reactive | 108288 | 3415 | 837 | **4252** | **118062** |
| 3 | **Reactivity Rate** | **1.09** | **0.56** | **0.48** | **0.54** | **1.01** |
| 4 | No.of general clients tested for HIV | 1513751 | 476346 | 129086 | **605432** | **2673441** |
| 5 | No. of persons HIV+ve | 219496 | 40085 | 13832 | **53917** | **336970** |
| 6 | **HIV Positivity Rate** | 14.50 | 8.42 | 10.72 | 8.91 | 12.60 |
| 7 | No.of Pregnant women tested for HIV | 1030405 | 543446 | 90978 | **634424** | **2309466** |
| 8 | No. of persons HIV+ve | 16142 | 2892 | 659 | **3551** | **24152** |
| 9 | **HIV Positivity Rate** | **1.57** | **0.53** | **0.72** | **0.56** | **1.05** |
| 10 | No.of Clients tested for HIV in ICTC (4 + 7) | **2544156** | **1019792** | **220064** | **1239856** | **4982907** |
| 11 | No. of clientsfound HIV+ve ( 5 + 8) | **235638** | **42977** | **14491** | **57468** | **361122** |
| 12 | **HIV Positivity Rate** | **9.26** | **4.21** | **6.58** | **4.64** | **7.25** |
| 13 | No. of AIDS Cases | 51591 | 7518 | 2470 | **9988** | **77058** |
| 14 | No. of AIDS Deaths | 3158 | 736 | 150 | **886** | **4801** |

# LIST OF PPTCT NGOs

| Sr. No. | District | NGO Name | Address for Correspondance |
|---|---|---|---|
| 1 | THANE | Saryajani Mahila Utkarsh Sanstha | c-1/248,kasturi plaza, Manpada road, Dombiwali Thane-421 201 |
| 2 | | Network in Thane by People Living with HIV/AIDS | Room no. 101, 1st floor, shivam bldg.,Opp. Bhanusagar Cinema,Kalyan (W) |
| 3 | PUNE | John Paul Slum Development Project | post Box No. 5,M-39, Flat No.1640, Maharashtra Housing Board, Post-Yerwada,Pune-411 006 |
| 4 | | Saudamini(Network of People for Positive Women & Children | C/o Panchsheel Hospital,368,Nana peth,Pune-411 020 |
| 5 | AHMED NAGAR | Network of Ahmednagar Dist. By People Living with HIV/AIDS | House No. 4406, Nimbalkar Galli, Juna Mangalwar Bazar, Ahmadnagar |
| 6 | | Priyadarshani Gramin & Adivasi Sevabhavi Sanstha | At.Post- Ghulewadi, Tal-Sangamner,Ahamadnagar-422 605 |
| 7 | AURANGABAD | Council for Rural Technology & Research Institute | House No. 230,Dana Bazar,Cantonment Aurangabad-431 002 |
| 8 | NAGPUR | Rashtra Sant Tukdoji Maharaj Technical & Education Society | Kumbhalkar Bhawan, Agyaramdevi Chowk, Ganeshpeth, Nagpur-440 418 |
| 9 | | Manav Vikas Bahuuddeshiya Gramin Seva Sanstha | 8, Pasaydan, Pandhrinath Colony, Daulatwqadi, Amravati Rd., Wadi, Nagpur-440 023 |
| 10 | SANGLI | Yerala Projects Society | Yerla Bhavan, Miraj Road, Sangli-416 415 |
| 11 | KOLHAPUR | Lotus Medical Foundation | Plot No. 146-A Ward, Dudhali, Near Rankalawes St. Stand, Lolhapur-416 012 |
| 12 | AMRAWATI | Rashtra Sant Tukdoji Maharaj Arogya Va Shikshan Prasarak Mandal | At.Post- Gurudeo Nagar, (Gurukunj Ashram), Tal-Teosa,Amrawati |
| 13 | YAVATMAL | Saiprem Gramin Vikas Sanstha | 21,Vardhaman Nagar, Behind SukhKarta Hotel, Darwah Road, Yavatmal. |

| | | | |
|---|---|---|---|
| 14 | **WARDHA** | Noble Shikshan Sanstha | Mohini Nagar, Nagpur Road, Wardha. |
| 15 | **SOLAPUR** | Seva Dham Trust | C/O Manoj Clinic,11488,Sadashiv peth,Pune-411 030 |
| 16 | **NASHIK** | Anusaya Shikshan Prasarak Mandal,Sanch. Manas vyasan Mukti Kendra,Nashik. | Wing No.1,First Floor,Above mesh Optician, Stadium Complex M.G. Road, Nashik. |
| 17 | **GONDIYA** | Drusti Bahuuddeshiya Vikas Sanstha, Gondiya | C/O RN Chatur (A) Civil line's Opp. Civil Court, Gondiya |
| 18 | **JALGAON** | Adhar Bahuuddeshiya Sanstha / Ankur Pratishthan,Amalner,Jalgaon | Station Road, Chikate Galli, New Plot,Amalner |
| 19 | **NANDURBAR** | Jijau Mahila Maratha Samaj Unnati Mandal Nandurbar | Satyam Hospital Hat Dharwaja Gandhi Chowk Nandurbar |
| 20 | **CHANDRAPUR** | Harshal Gramin Vikas Bahuuddeshiya Sanstha,Chandrapur. | C/o Dr. Sandeep Pipre, Vatchal Bhavan Vivek nagar mul road ChandrapurNr. Dr. Soitkar |
| 21 | **SINDHUDURG** | Foundation for Health Education & Cultural Activities,Sindhudurg | Dr.B.B. Gaitonde, Deulwada, Banada, Sindhudurg |
| 22 | **SATARA** | Network of Satara by People living with HIV/AIDS, Satara | Kasturba Hospital Awar, Rajwada, Satara |
| 23 | **OSMANABAD** | Swayam Shikshan Prayog, Osmanabad | Near Jyoti Photo Studio, Samata Nagar, Osmanabad |
| 24 | **HINGOLI** | Priyadarshani Seva Sanstha, Hingoli | Vikas Nagar,Kalmnuri, At Post Kalamnuri, Dist. Hingoli-431702 |
| 25 | **NANDED** | Janakalyan Vikas Mandal, Nanded | Toshniwala Hospital Ghammodiya Factory Vajarabad Nanded |
| 26 | **JALNA** | Jalna Mission Hospital ,New Jalna | RPTS Road New Jalna 431203 |
| 27 | **BHANDRA** | Bhartiya Aushadhi Anusandhan Sanstha, Bhandara | At Post Khapa,Tal. Tumsar, Dist. Bhandara |
| 38 | **WASHIM** | Jai Samka Kalyani Bahuuddeshiya Sanstha, ,Khirda Tq.Malegaon,Dist.Washim | Godha Complex, Patni Chowk, Washim |

| | | | |
|---|---|---|---|
| 29 | **AKOLA** | Gunwant Shikshan Sanstha, Akola | Digambar Towers Ranpise Nagar Opp. Shirsat Market,Akola- 444005 |
| 30 | **GADHCHIROLI** | Nav Yuvak Gramsudhar Samitee, Gadhchiroli | Veena Sadan,13/284, New Ganesh Colony,Talab Road, Gadhchiroli 442605 |
| 31 | **BULDHANA** | People Education Society, Buldhana | Near Nav-Jeevan Hospital, Shri Shivaji Vidhyalaya Road, Suvarna Nagar, Buldhana |

# List of ART centres in Maharashtra

| Sr.No. | ART Centres | |
|---|---|---|
| 1 | J.J.Hosp. Mumbai | Under Maharashtra State AIDS Controal Society |
| 2 | K.E.M. Parel | |
| 3 | Sion, Mumbai | |
| 4 | Nair, Mumbai | |
| 5 | PVPG Sangli | |
| 6 | Sasoon G H Pune | |
| 7 | Govt. Med. College, Nagpur | |
| 8 | Nari Pune | |
| 9 | Govt. Med. College, Dhule | |
| 10 | Govt. Med. College, Akola | |
| 11 | Aurangabad | |
| 12 | SRTR Ambejogai, Beed | |
| 13 | Govt. Med. College, Yavatmal | |
| 14 | Govt. Med. College, Solapur | |
| 15 | Govt. Med. College, Nanded | |
| 16 | Civil Hosp. & Govt. Med. College, Latur | |
| 17 | Govt. Med. College, Kolhapur | |
| 18 | G.H.Thane (New) | |
| 19 | G.H.Jalgaon (New) | |
| 20 | G.H.Satara (New) | |
| 21 | G.H.Parbhani (New) | |
| 22 | G.H.Nasik (New) | |
| 23 | G.H.Ratnagiri (New) | |
| 24 | G.H.Chandrapur (New) | |
| 25 | G.H.Wardha (New) | |
| 26 | G.H.Ahmadnagar (New) | |
| 27 | Bilt Chandrapur | |
| 28 | Yeshwantrao Chavhan Medical Hospital, Pimpari Chinchwad, Pune | |

# जागतिक एड्स नियंत्रण दिन सप्ताह २००८

## पत्रकार परिषदेच्या प्रत्याभरण अहवालाचा मसुदा

| अ.क्र. | उपस्थित पत्रकाराचं नाव | प्रसारमाध्यमाचे नाव | दुरध्वनी क्र. | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

जिल्हा शल्य चिकित्सक
सही व शिक्का

टिप: उपरोक्त तक्त्यात पत्रकार परिषदेची माहिती महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेस अंतिम अहवालासोबत सादर करावी.

* * * * * *

## जागतिक एड्स नियंत्रण दिन सप्ताह २००८
## प्रसार माध्यमातून मिळालेल्या प्रसिद्धीचा अहवाल

| अ.क्र. | प्रसारमाध्यमांचे नाव | प्रसिद्धीची दिनांक | प्रसिद्धीच स्वरूप बातमी / छायाचित्र |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

जिल्हा शल्य चिकित्सक
सही व शिक्का

टिपः उपरोक्त अंतीम अहवालासोबत तक्त्यात उपक्रमास मिळालेल्या एकूण प्रसिद्धीची महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेस कात्रणांसह सादर करावी.

* * * * * *

# Statement of Expenditure

To: Maharashtra State AIDS Control Society – Mumbai

From : ______________________________________________________________

Funds received vide demant draft no. _______________ dated ___________________ favouring __________________________ for Rs. ________________________ (Rupees ________________________________________________ )

Funds Received For –

| Sr. No. | Voucher No. | Voucher Dt. | Amount | Supplier/Party/ Participation/ Others | Purpose of Expenditure |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

Amount Received :
Less: Amount spent as above :
Balance unutlized amount : Sent back to your Society vide DD No. _____________ dated ______________ favourving ____________________________ drawn on____ ____________________________________ .

(Note – The Original Vouchers of Expenditure and relevant documents have been kept at this office and the same are available for audit, when needed. Certified that the above expenditure statement is true and the funds have been utilized for the activity for which the same have been disbursed)

Implementing Officer
(Signature with Stamp)

Head of the Institution
(Signature with Stamp)

# Utilization Certificate

| (Addressed Rubber Stamp of the Institute to be impressed here) |
|---|
| |

Certified to Maharashtra State AIDS Control Society, Mumbai that Rs. ____________ (In Figures) (Rupees ______________________________________________) (In words) were received vide Cheque No. / Demand Draft No. ______________________ dated ______________ out of which Rs. ___________________ (in figures) (Rupees ________________________________________) (in words) has been utilized for ____________________________________________________________ _________________________________________________ (Name of the Function / Programme / Rally / Campaign / Event / Others along with day, date, time, duration of the same) the enclosed statement of account sent to you is authentic and supportive with bills and vouchers, the said grant is spent in the best interest of the said programme as per the directives issued by the Society.

Of the total amount received, unspent amount of Rs. ________________ (Rupees ________________ _____________________________________________) has been returned back to the Society vide D.D. No. _________________ dated ______________ drawn on _____________________________

Implementing Officer
(Signature with Stamp)

Head of the Institution
(Signature with Stamp)

## जागतिक एड्स दिनाच्या निमित्ताने आयोजित प्रभात फेरीच्या शेवटी व महिला मेळाव्याच्या शेवटी घ्यावयाच्या शपथेचा मसुदा

जागतिक एड्स दिन २००८ रोजी मी, माझे कुटूंबीय आणि माझे मित्र अशी शपथ घेतो की,

- आम्ही आरोग्यपूर्ण जीवन जगू आणि माझे आणि माझ्या जवळच्या सर्वांचे एचआयव्ही/एड्स पासून संरक्षण करु.
- एचआयव्ही/एड्स बाधित कोणाही व्यक्तीची काळजी घेऊ, त्यांना मदतीचा हात देऊ, तसेच त्यांच्या कुटूंबीयांना सुध्दा मदत करु.
- कोणतीही एचआयव्ही/एड्स बाधित व्यक्ती कामाच्या ठिकाणी, शाळेत, महाविद्यालयात, रुग्णालयात आढळल्यास त्याला कलंकीत समजून भेदभाव करणार नाही यासाठी माझ्या सहवासातील इतर व्यक्तींना एचआयव्ही/एड्स संबंधीत माहिती देण्यास मदत करीन.
- कोणतीही एचआयव्ही/एड्स बाधित व्यक्ती मानवाधिकारापासून वंचित राहणार नाही याची काळजी घेईन.